


२० व्या वर्षात पदार्पण करणारे एकमेव साप्ताहिक

साप्ताहिक भारतभर वितरीत होणारे RNI New Delhi-MAHMAR/2011/41080

लेवा जगत

किंमत 10 रु.

संपादक : शाम वसंत पाटील



वर्ष २० वे | अंक ५ वा | वार–रविवार | रविवार दि.२६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ | पाने–४ | पान क्र.–१

रावेरच्या केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारवर अंबादास दानवेंचा हल्लाबोल

केळीला फळाचा दर्जा मिळवून देण्यासाठी विधानपरिषदेत पाठपुरावा करणार; शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या विराट जनआक्रोश मोर्चात आश्वासन



रावेर । लेवाजगत न्यूज– शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, विद्यार्थी आणि सुशिक्षित बेरोजगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आयोजित विराट जनआक्रोश मोर्चातून राज्य सरकारवर जोरदार टीका करण्यात आली. या मोर्चाचे नेतृत्व शिवसेना नेते, विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते तथा विद्यमान आमदार अंबादास दानवे यांनी केले. यावेळी रावेर तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या, केळीला फळाचा दर्जा देण्याची मागणी आणि केळीवर आधारित उद्योग उभारणीचा मुद्दा प्रामुख्याने उपस्थित करण्यात आला.(पान नं.२ वर)

कासोदा पोलीस प्रशासन व महसूल विभागाची अवैध वाळू माफियावरसंयुक्त कार्यवाही

कासोदा –प्रतिनीधी–




येथील पोलीस स्टेशन हद्दीत सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी कासोदा पोलीस स्टेशन व एरंडोल महसूल विभागाने संयुक्तरित्या केलेल्या धडक कारवाईत चार वाहने, ७६ ब्रास वाळूसह ३१ लाख ५८ हजार १०७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.२५ व २६ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास उत्राण गावाच्या वेशीजवळ, वळ, माहुरी मंदिराजवळ तसेच करदन शिवारातील गिरणानदीपात्र परिसरात ही कारवाई करण्यात आली. केवळ वाहने जप्त न करता, अवैधरित्या साठवून ठेवलेला सुमारे ६० ब्रास वाळूचा मोठा ढिगारा देखील जप्त करूनतहसील कार्यालयात हलविण्याची कार्यवाही महसूल विभागाने पार पाडली आहे. या प्रकरणी निलेश राजेंद्र भादाणे, बापू महादेव शिराळे, शाहरुख शब्बीर पठाण, भुषणशिवाजी सोनवणे यांच्यावर गुन्हा दाखल दाखल करण्यात आला असून एक चालक फरार होण्यात यशस्वी झाला आहे.कासोदा पोलीस स्टेशनचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत पाटील, नितीन सूर्यवंशी, धर्मेंद्र ठाकुर, श्रीकांत ब्राम्हणे, निलेश गायकवाड, योगेश पाटील, तहसीलदार गोपाल पाटील, ग्राम महसूल अधिकारी रवीराज पाटील, वैभव पाटे, संदीप पाटील, नरेंद्र पाटील, मंडळ अधिकारी नदीम शेख आदींच्या पथकाने ही कामगिरी केली.

सरदार पटेल जयंती,राष्ट्रिय एकात्मता दिन,हिंदू रत्न पुरस्कर वितरण समारंभाचे पुणे येथे आयोजन

डॉ.पांडूरंग सराफ,ममता पाटील,विजयमाला पवार यांना पुरस्कार जाहिर





उरुळी कांचन: अखंड भारताचे शिल्पकार लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल जयंती कार्यक्रम व राष्ट्रीय एकात्मता दिन कार्यक्रम पुणे येथे होणार आहे. यावेळी समर्पित भावनेने विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या सेवाव्रती कार्यकर्त्यांना भारतरत्न सरदार पटेल हिंदू रत्न पुरस्कार प्रदान केले जाणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन पद्मश्री डॉ मणी भई देसाई मानव सेवा ट्रस्ट युवक क्रीडा मंत्रालय, निती आयोग भारत सरकार सलग्नित संस्थेच्या वतीने करण्यात आल्याचे ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार संस्थेचे अध्यक्ष संस्थापक डॉ. रवींद्र भोळे यांनी येथे माहिती दिली. हा कार्यक्रम ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा ते नऊ दरम्यान संकल्प बँकेट हॉल एलबीएस मार्ग नवी पेठ पुणे येथे होणार आहे. या कार्यक्रमाला माननीय रवींद्र साठे अध्यक्ष खादी व ग्रामोद्योग राज्यमंत्री दर्जा स्वतंत्र विभाग मंत्रालय मुंबई ,हे प्रमुख पाहुणे असून यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.यावर्षीच्या सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार जाहीर झालेल्यांमध्ये डॉ. पांडुरंग दगडू सराफ (सामाजिक धार्मिक , धार्मिक ,शैक्षणिक, कार्य)सांकेगाव जळगाव,(सौ ममता यशवंत पाटील (शासकीय सामाजिक कार्य) मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक मुंबई, माननीय सौ विजय माला महादेव पवार (उत्कृष्ट तपास पुरस्कार) वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरुळी कांचन पोलीस स्टेशन पुणे, डॉ.सुरेश जगन्नाथ रौंदळे (सामाजिक धार्मिक कार्य) निमखेड बाजार, रश्मी नरेंद्र जोशी (सामाजिक) मुंबई, डॉ. स्मिता विनायक सहस्रबुद्धे (साहित्यिक शैक्षणिक) पुणे, डॉ.हरी निवृत्ती पाटील (सामाजिक , अध्यात्मिक) औंध पुणे, प्रल्हाद गोपाळ खर्चे (चीफ ब्युरो राष्ट्रीय प्रसार नॅशनल न्यूज)नई दिल्ही, वासुदेव रामभाऊ भंगाळे (सामाजिक/ सहकार) मुक्ताईनगर, डॉ.रघुनाथ महादू पाचपांडे (सामाजिक वैद्यकीय आदर्श शेती) मुक्ताईनगर, राजेश दातार(शास्त्रीय उपशास्त्रीय सुगम संगीत गायक) पुणे जगन्नाथ विठ्ठल जगताप (वैद्यकीय सामाजिक कार्य) जळगाव सुपे, दिलीप गोविंदराव डहाके (समाज प्रबोधन छंद सम्राट) पुणे संदीप भानुदास तापकीर (इतिहास अभ्यासक लेखक संपादक साहित्यिक) चरोली पुणे,रामचंद्र पांडुरंग ढाके (सामाजिक धार्मिक) भुसावळ, आपले परिवार सार्वजनिक वाचनालय (आदर्श ग्रंथालय पुरस्कार) संचालक शांताराम जगन्नाथ पाटील भुसावळ, प्रमोद नारायण सरोदे (पान नं.२वर)

दुष्काळाच्या संकटात प्रशासन सज्ज राहावे;जनतेला मदतीसाठी एकजुटीने काम करा

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे अधिकाऱ्यांना निर्देश; पाणीपुरवठा, चारा निर्मिती, जलसंधारण आणि रोजगाराच्या कामांना गती देण्यावर भर



जळगाव । प्रतिनिधीजळगाव जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वयाने आणि युद्धपातळीवर काम करावे. अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेटी देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती कक्षात २७ ऑक्टोबर रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित दुष्काळ निवारण आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत पाणीटंचाईवरील उपाययोजना, जलसंधारण, पशुधनासाठी चारा, रोजगारनिर्मिती, शेतकऱ्यांना सवलती आणि अपूर्ण पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेण्यात आला.

जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य

जिल्ह्यातील किमान १०० कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांवर आवश्यक फळ्या बसविणे, नादुरुस्त बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे आणि आवश्यक ठिकाणी नीडल बसविण्याची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. गाव तलाव व पाझर तलावांमधील गाळ काढणे, नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करणे आणि कृषी बंधाऱ्यांसाठी योग्य स्थळे निश्चित करून तालुकानिहाय प्रस्ताव सादर करण्याचेही त्यांनी सांगितले.प्रत्येक ग्रामपंचायतीने चार ते पाच वनराई बंधारे उभारण्याचे नियोजन करावे. जिल्ह्यात सात हजारांहून अधिक वनराई बंधारे उभारण्याचे उद्दिष्ट ठेवावे.

तसेच एक लाख जलतारा निर्मितीचे नियोजन करून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी प्रयत्न करावेत. शासकीय इमारतींवर रेनवॉटर हार्वेस्टिंग्चा माध्यमातून पावसाचे पाणी साठविणे आणि भूजलपातळी वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

अंतर्नाद प्रतिष्ठानचा सेवेचा दीप उजळतोय अकराव्या वर्षात

'वाटीभर फराळ' उपक्रमातून वंचितांची दिवाळी गोड करणार



लेवा जगत प्रतिनिधी :–दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचावा आणि वंचित कुटुंबांच्याही आयुष्यात सणाचा गोडवा फुलावा, या सामाजिक भावनेतून भुसावळ येथील अंतर्नाद प्रतिष्ठानतर्फे राबविण्यात येणाऱ्या 'वाटीभर फराळ द्या, वंचितांचे तोंड गोड करा' या उपक्रमाचे यंदा अकरावे वर्ष आहे. यानिमित्ताने सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या आदिवासी पाड्यावर ७ नोव्हेंबर रोजी दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या नियोजनासाठी रविवारी, २५ ऑक्टोबर रोजी बैठक घेण्यात आली.सण-उत्सवांचा आनंद समाजातील प्रत्येक घटकाला अनुभवता यावा, या उद्देशाने प्रतिष्ठानने २०१६ मध्ये या उपक्रमाला सुरुवात केली. पहिल्या वर्षी चोपडा तालुक्यातील कुंड्यापाणी येथे झालेल्या या उपक्रमाचा प्रवास पुढे विविध दुर्गम आदिवासी वस्त्यांपर्यंत पोहोचला. जोगलखोरी, जुनी मोहमांडली, काळाडोह, मोर धरण, विटवा, आसराबारी, जामुन झिरा, डोंगरदे, गायरान, नागदेवी, लसणीबर्डी आणि माथन यांसारख्या वस्त्यांमध्ये प्रतिष्ठानच्या माध्यमातून दिवाळीचा आनंद पोहोचविण्यात आला आहे.यंदाही शहरातील नागरिक आणि दात्यांच्या सहकार्यातून फराळ, कपडे, चपला-बूट, शालेय साहित्य तसेच किराणा साहित्य संकलित करून आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली जाणार आहे. आर्थिक मदतीसोबतच वस्तुरूपाने योगदान देण्याची संधीही या उपक्रमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्वच्छ धुतलेले व इस्त्री केलेले वापरण्यायोग्य जुने कपडे, नवीन कपडे, दप्तर, शालेय साहित्य, स्वेटर, ब्लँकेट आणि इतर आवश्यक वस्तू देऊन नागरिक या सामाजिक कार्यात सहभागी होऊ शकतात.गतवर्षी या उपक्रमांतर्गत जवळपास ४५० नागरिकांना फराळ, कपडे, चपला, शालेय साहित्य, साखर आणि तांदळाचे वाटप करण्यात आले होते.

यंदा हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा प्रयत्न असून, इच्छुकांनी आपले योगदान ४ नोव्हेंबरपर्यंत प्रतिष्ठानकडे सुपूर्द करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.सहभागाचे आवाहनया उपक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होऊन वंचित कुटुंबांच्या दिवाळीत आनंदाची भर घालावी, असे आवाहन प्रकल्पप्रमुख योगेश इंगळे, समन्वयक प्रसन्ना बोरोले, सहसमन्वयक जीवन महाजन आणि समाधान जाधव यांनी केले आहे.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर घुले, प्रदीप सोनवणे, डॉ. संजू भटकर, शैलेंद्र महाजन, कुंदन वायकोळे, राहुल भारंबे, विक्रांत चौधरी, हितेंद्र नेमाडे, अमित चौधरी, अमितकुमार पाटील, देव सरकटे, राजू वारके, हरीश भट, डॉ. प्रा. श्याम दुसाने, तेजेंद्र महाजन, भूषण झोपे, विपिन वारके, कपिल धांडे, ललित महाजन, उमेश फिरके, केतन महाजन, चंद्रकांत सूर्यवंशी, शिरीष कोल्हे, प्रमोद पाटील, निवृत्ती पाटील, सचिन पाटील, जीवन सपकाळे, मंगेश भावे, योगेश साळुंके, किशोर नेहेते, दीपक नेहेते, हर्षा पाटील यांच्यासह अंतर्नाद प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप पाटील आणि प्रतिष्ठानचे स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.

सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानांचे विलीनीकरण करुन अखंड भारताचा पाया रचला-डॉ.रविंद्र भोळे



उरुळी कांचन –येथे राष्ट्रीय एकता रॅलीचे स्वागत; राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रभक्तीचा संदेशउरुळी कांचन : स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील ५६५ हून अधिक लहान-मोठ्या संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करून सरदार वल्लभभाई पटेल यांनी एकसंघ भारताच्या निर्मितीत ऐतिहासिक योगदान दिले. जुनागड, हैदराबाद यांसारख्या संस्थानांच्या विलीनीकरणातील आव्हानांना सामोरे जात त्यांनी देशाच्या एकात्मतेसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल हे अखंड भारताचे शिल्पकार ठरतात, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक, प्रवचनकार आणि दिव्यांग सेवक डॉ. रवींद्र भोळे यांनी केले.सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाच्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन येथे अखंड भारत राष्ट्रीय एकता रॅलीतील सहभागी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वागताचा आणि अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. भोळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.गुजरातमधील केवडिया येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर अंदमान-निकोबार, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, तेलंगणा आणि पुदुच्चेरी येथील पोलीस अधिकारी व अंमलदार सहभागी असलेली अखंड भारत राष्ट्रीय एकता रॅली आयोजित करण्यात आली होती. ही रॅली उरुळी कांचन येथे दाखल झाल्यानंतर स्थानिक पोलीस प्रशासन आणि ग्रामस्थांच्या वतीने तिचे स्वागत करण्यात आले.उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार, पोलीस अधिकारी आणि ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे यांनी रॅलीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.या रॅलीचा प्रमुख उद्देश व्यसनमुक्तीचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविणे, राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे, नागरिकांमध्ये राष्ट्रभक्तीची ज्योत तेवत ठेवणे आणि देशाप्रती प्रेम व अभिमान निर्माण करणे हा होता. अशा उपक्रमांमुळे विविध राज्यांतील पोलीस दलांमध्ये समन्वय वाढण्याबरोबरच नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकतेचा संदेश पोहोचण्यास मदत होते.कार्यक्रमाला शिवाजीराव कांचन, दैनिक सकाळचे पत्रकार सुनील जगताप, बाळकृष्ण काकडे, संतोष कांचन, मयूर कांचन, सुनील तुपे, सुरेश वाडेकर, दैनिक केसरीचे पत्रकार अमोल भोसले, महा सुपरफास्ट न्यूजच्या संपादिका सुवर्णा कांचन, महाराष्ट्राची भूमीचे बाबुराव चौधरी, महंत गोपाळदास कपाटे, निखिल कांचन, पत्रकार शंकर झरड, किरण भंडारी आदी उपस्थित होते.यावेळी उरुळी कांचन पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक, स्वामी विवेकानंद विद्यामंदिरातील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि राष्ट्रभक्तीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पशुसंवर्धन विभागाचे काटेकोर नियोजन;दुष्काळग्रस्त ३०५ तालुक्यात पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी करण्याचे आवाहन

लेवा जगत न्युज– राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये घोषित करण्यात आलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पशुधनाची चारा व पाण्याची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी पशुसंवर्धन विभागाने काटेकोर नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. दुष्काळकाळात पशुधनाला आवश्यक असणारा चारा, चारा बियाणे व ठोंबे वाटप, वैद्यकीय उपचार व इतर अनुषंगिक सेवांचा पुरवठा अचूकपणे व्हावा, यासाठी सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाची नोंदणी एनडीएलएम, अर्थात 'भारत पशुधन प्रणाली' वर अद्यावत करावी, तसेच नवीन पशुधनाचे टॅगिंग करून नोंदणी करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.दुष्काळसदृश परिस्थितीत शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना, मदत कार्य व सवलतींचा लाभ थेट गरजू पशुपालकांच्या पशुधनापर्यंत पारदर्शकपणे पोहोचविण्यासाठी पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी असणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित पशुपालकांनी तात्काळ आपल्या परिसरातील नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा. आपल्या पशुधनाची अचूक नोंदणी व नवीन पशुधनाच्या कानात १२ अंकी बिल्ला टोचून त्याबाबत नोंद भारत पशुधन प्रणालीवर करण्याबाबतची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे. राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संगोपन व संवर्धन करणे ही पशुसंवर्धन विभागाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. प्रत्येक पशुपालकाने आपल्या पशुधनाची अचूक नोंदणी आणि टॅगिंग 'भारत पशुधन' प्रणालीवर करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. या डिजिटल नोंदणीमुळे आपत्कालीन परिस्थितीत चारा बियाणे, ठोंबे व इतर मदत अचूकपणे व थेट पात्र पशुपालकापर्यंत पोहोचवणे आम्हाला शक्य होईल. सर्व पशुपालकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा.

– डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.)

आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे.

दिवाळीत रात्री १० वाजेनंतर फटाके वाजविण्यास मनाई;ध्वनी व हवा प्रदूषण टाळण्याचे प्रशासनाचे आवाहन

जळगाव, दि. २८ (जिमाका) : मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्र. ७२/१९९८ दि.२७/९/२००१ च्या अंतरिम आदेशानुसार दिवाळी सणाच्या कालावधीत ध्वनी व हवा प्रदूषणामुळे होणारे अपायकारक परिणाम टाळण्यासाठी फटाके वाजविण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. नागरिकांनी या निर्देशांचे पालन करून दिवाळी सण सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, पाचोरा , भूषण अहिरे यांनी केले आहे. फटाक्यांमुळे होणारे ध्वनी व हवा प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यानुसार, पर्यावरण (संरक्षण) नियमांमधील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.फटाका उडविण्याच्या ठिकाणापासून चार मीटर अंतरावर १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांचे उत्पादन, विक्री व वापर करण्यास बंदी आहे. तसेच साखळी फटाक्यांसाठी निर्धारित ध्वनी मर्यादांचे पालन करणे बंधनकारक असून, नियमांनुसार प्रतिबंधित असलेल्या साखळी फटाक्यांचे उत्पादन, विक्री व वापर करता येणार नाही.फटाके(पान नं.२ वर)